NOTICE

Tata Steel Limited

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai 400 001.

NOTICE is hereby given that the Certificates for the under mentioned securities of the Company has been lost and the holder of the said securities has applied to the Company to issue Duplicate Certificates.

Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the Company at its Registered Office within **15 days** from this date, else the Company will proceed to issue Duplicate Certificates without further intimation

Name of holder	Kind of Securities and Face Value	No. of Securities	Distinctive Numbers
Kamal D. Bhavnani	Equity FV Rs. 10	92	610651785-610651876
		307	250757045 - 250757351

Place : Mumbai.
Date : 30.11.2018.

Kamal D. Bhavnani
(Name of holder)

जाहीर सूचना

हे ग्राहकांना कळविण्यासाठी आहे की, **स्टार इंडिया प्रा. लि.** चॅनेल्सचे सिग्नल्स: (चे समाविष्ट –स्टार प्लस एचडी, स्टार भारत एचडी (पूर्वीचे लाईफ ओके एचडी), स्टार गोल्ड एचडी, स्टार स्पोर्ट्स् एचडी १, स्टार स्पोर्ट्स् एचडी २, स्टार स्पोर्ट्स् १ एचडी हिंदी (पूर्वीचे स्टार स्पोर्ट्स् एचडी ३), स्टार स्पोर्ट्स् सिलेक्ट एचडी १, स्टार स्पोर्ट्स् सिलेक्ट एचडी २, स्टार वर्ल्ड प्रीमियर एचडी, स्टार वर्ल्ड एचडी, स्टार मुव्हीज सिलेक्ट एचडी, स्टार मुव्हीज एचडी, नॅशनल जिओग्राफिक एचडी, नॅट जिओ वाईल्ड एचडी, नॅट जिओ पीपल एचडी, फॉक्स लाईफ एचडी, बेबी टीव्ही एचडी,नॅट जिओ म्युझिक एचडी, स्टार प्रवाह एचडी, स्टार जलशा एचडी, जलशा मुव्हीज एचडी, विजय एचडी, एशियानेट एचडी, माँ एचडी, स्टार गोल्ड सिलेक्ट एचडी, माँ मुव्हीज एचडी आणि सुवर्णा एचडी) (एकत्रितरित्या ''चॅनेल्स'' असा उल्लेख) खालील केबल ऑपरेटर(र्स)संदर्भात, सदर चॅनेल्सकरिता **वर्गणी अप्रदान, वर्गणी करारावर स्वाक्षरी न करणे आणि अहवाल सादर न करणे** च्या खात्यावर '**स्टार इंडिया प्रा. लि.**' द्वारे आजपासून तीन आठवड्यानंतर खंडित केले जातील.

केबल चालका (कां)चे नाव	पत्ता	क्षेत्रे
सना केबल नेटवर्क	चुन्नुमा चौक, हनुमान मंदिर जवळ, बीड – ४३११३१, महाराष्ट्र	माजलगाव एमसीएल

ऑपरेटर्स आणि त्यांचे फ्रेंचायझीज द्वारे सर्व क्षेत्रे बाधीत असतील.

Star

निर्गमित द्वारे:
स्टार इंडिया प्रा. लि.
स्टार हाऊस, ऊर्मी इस्टेट, ९५, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०० ०१३.

---

punjab national bank ...the name you can BANK upon !

बीओ: वाशी मेन
सेक्टर–१, नवी मुंबई– ४००७०३
मेल आयडी– bo3502@pnb.co.in
दूर.क्र. ०२२–२७८२३४३७/२७८२३५१९
फॅक्स क्र. ०२२–२७८२६२३६

जोडपत्र IV

कब्जा सूचना

[नियम ८(I)]
(स्थावर मिळकतीसाठी)

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकर्ता यांनी **पंजाब नॅशनल बँक, वाशी शाखे**चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून कर्जदार/गहाणवटदार/हमीदार **श्री. कमलेश कल्याणजी मांगे आणि श्रीम. मंजुला के. मांगे** यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ३०.०६.२०१८ रोजी पासून **रु. ४०,२४,४३२.०६ (रुपये चाळीस लाख चोवीस हजार चारशे बत्तीस आणि सहा पैसे मात्र) त्यासह दिनांक ०१.०७.२०१८ रोजी** पुढील व्याज ही रक्कम सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून/सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत चुकती करण्यासाठी बोलाविण्याकरिता **१३.०७.२०१८** रोजी मागणी सूचना निर्गमित केलेली आहे.

कर्जदार/गहाणवटदार/हमीदार यांनी सदर रक्कम चुकती करण्यामध्ये कसूर केलेली आहे म्हणून कर्जदार /हमीदार /गहाणवटदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकर्त्यांनी त्याला/तिला प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून सदर अधिनियमाचे कलम १३(४) सहवाचता सदरहू नियमावली २००२ चा नियम ८ अन्वये याखाली वर्णिलेल्या मिळकतीचा **२७ नोव्हेंबर, २०१८** रोजी सांकेतिक कब्जा घेतलेला आहे.

विशेषत: कर्जदार/हमीदार/गहाणवटदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीवरील कोणताही देवघेवीचा व्यवहार हा **पंजाब नॅशनल बँक, वाशी शाखे**करिता रक्कम **रु. ४०,२४,४३२.०६ (रुपये चाळीस लाख चोवीस हजार चारशे बत्तीस आणि सहा पैसे मात्र)** आणि त्यावरील व्याज या रकमेच्या आकाराच्या अधीन राहील.

तारण मत्तांच्या भरणाकरिता उपलब्ध वेळेत सदर ॲक्टच्या कलम (१३) च्या उपकलम (८) च्या तरतुदीन्वये कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येते.

स्थावर मिळकतीचे वर्णन

''श्री राम को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि'' नामक सोसायटी मधील''तेज सागर'' नामक इमारती मधील १ ल्या मजल्या वरील फ्लॅट क्र. बी–४, मोजमापित क्षेत्र ५३६ चौ.फू. बिल्टअप क्षेत्र सदर जमीनीच्या ज्या भाग व विभागावरील बांधकाम धारक प्लॉट क्र. ३५३, ३५४ आणि ३५५, मोजमापित क्षेत्र ९०० चौ.मी.,सेक्टर क्र. १९, स्थित असलेले गाव– कोपरखैराणे, नवी मुंबई, तालुका– आणि जिल्हा–ठाणे चे ते सर्व भाग व विभाग श्री. कमलेश कल्याणजी मांगे यांच्या नावे.

सही/–
सिताराम बडेजा, मुख्य व्यवस्थापक
पंजाब नॅशनल बँक
प्राधिकृत अधिकारी
वाशी शाखा

ठिकाण: कोपरखैराणे, नवी मुंबई
दिनांक: २७.११.२०१७

मुंबई विडी–तंबाखू व्यापारी सहकारी पतपेढी मर्यादित
(रजि. क्र. बी.ओ.एम्/आर.एस.आर/९७७/१९७९)

सहजीवन को– ऑप. हाऊसिंग सोसायटी, गाळा नं. १, १० व १२, तळमजला, ना.म. जोशी मार्ग (दिपक सिनेमाजवळ), मुंबई–४०० ०१३.

नमुना ग नोटीस

१९६० व १९६१ नियम १६ (३)

संस्थेचे एकत्रीकरण/त्यांची मालमत्ता व जबाबदाऱ्यांचे हस्तांतरण यामुळे ज्यांच्या हितसंबंधाना बाधा येईल अशा सदस्यांना/धनकोस व इतर इसमास धोक्याची नोटीस बी.ओ.एम/आर.एस.आर/९७७/१९७९ अन्वये नोंदविण्यात आलेली आणि मुंबई या ठिकाणी जिचे नोंदणी कार्यालय आहे अशा मुंबई विडी तंबाखू व्यापारी सहकारी पतपेढी मर्यादित, लोअर परेल सहजीवन को– ऑप. हौसिंग सोसायटी, गाळा नं. १, १० व १२ तळमजला, ना. म. जोशी मार्ग (दिपक सिनेमाजवळ), मुंबई–४०० ०१३ या संस्थेकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० यांच्या कलम ६० पोटकलम (१) च्या परंतुकांची कडीका (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे सर्व सदस्य/धनको हितसंबंध असलेले इसम यांस नोटीस देण्यात येते की, निबंधकांची संमती मिळविल्यानंतर आणि संस्थेच्या दिनांक २९.०९.२०१८ रोजी भरलेल्या वार्षिक अधिमंडळाच्या बैठकीत तशा अर्थाचा प्रारंभ ठराव मंजुर करण्यात आल्यानंतर संस्थेने धनकृपा को– ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नोंदणीकृत पत्ता – ए डिसोझा चाळ, स्टेट बँकसमोर, गुडलक मटन शॉप शेजारी, कांजुर व्हिलेज (पूर्व), मुंबई–४०० ०४३ नोंदणी क्रमांक बीओएम/डब्ल्यू–एस/आरएसआर/सीआर/८८९८/सन २००२ या संस्थेचे एकत्रीकरण करण्याचे व सदर संस्थेची मालमत्ता व जबाबदाऱ्या मुंबई विडी तंबाखू सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई या संस्थेकडे हस्तांतरित करण्याचे ठरविले आहे. जिचे एकत्रीकरण हस्तांतरण करावयाचे त्या संस्थेच्या जबाबदाऱ्या हस्तांतरणासंबंधीचा तपशील पुढील अनुसूचित दिलेला आहे. एकत्रीकरण करणाऱ्या मालमत्ता व जबाबदाऱ्या हस्तांतरण करणाऱ्या संस्थेच्या बाबतीत पुढील गोष्टी लागू असतील.

१. संस्थेचे नाव: मुंबई विडी तंबाखू व्यापारी सहकारी पतपेढी मर्यादित
२. संस्थेची मालमत्ता व जबाबदाऱ्या दर्शविणारे पत्रक: (सोबत जोडलेले आहे)
३. सदस्य व धनको यांची नावे: (सोबत यादी जोडली आहे)
४. कार्यक्षेत्र: बृहन्मुंबई व ठाणे शहर

विशेष सूचना: एकत्रिकरण मालमत्ता व जबाबदाऱ्या हस्तांतरण यामुळे ज्या संस्थेवर परिणाम झाला आहे अशा दोन्ही संस्थांची माहिती स्वतंत्रपणे देण्यात येईल. नियोजित एकत्रीकरण, मालमत्ता व जबाबदाऱ्या यांचे हस्तांतरण यामुळे ज्या संस्थेच्या हितसंबंधावर परिणाम झाला आहे. अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीशीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत संस्थेच्या कार्यालयाकडे आपल्या कोणत्याही हरकती आल्यास त्या पाठविण्याचा आणि नवीन संस्थेच्या होण्यासंबंधी निवड करण्याचा आपला अधिकार कळविण्याचा/एकत्रीकरण केलेल्या संस्थेतील आपले सदस्यत्व चालू ठेवण्याचा/आपल्या शेअर्सची हितसंबंधाची किंवा येणे असलेल्या रकमेची मागणी करण्याचा अधिकार आहे. ३० दिवसांच्या आत निवड करण्यासंबंधी कोणताही अधिकार चालविण्यात आला नाही आणि कोणतीही हरकत आली नाही, तर हितसंबंध व्यक्तीची त्या निर्णयास मान्यता आहे, असे समजण्यात येईल.

शिक्का

सही/–
अध्यक्ष
मुंबई विडी तंबाखू व्यापारी सहकारी पतपेढी मर्यादित मुंबई
(सहजीवन को– ऑप. हाऊसिंग सोसायटी, गाळा नं. १, १० व १२ तळमजला, ना.म. जोशी मार्ग, मुंबई–४०० ०१३

स्थळ: मुंबई
दिनांक: ३०.११.२०१८

(BYP)

जाहीर सूचना

सूचना देण्यात येते की, नित्य सुखधाम सी.एच.एस लि., तावरीपाडा, डॉ. एस.एस. राव रोड, लालबाग, मुंबई–४०० ०१२ चे वसंत तुकाराम राणे यांच्या नावावरील शेअर प्रमाणपत्र क्र. ३४ चे पाच शेअर्स धारक क्र. ०१६६ ते ०१७० हे हरविले/गहाळ झाले असून त्यांच्या पत्नी वनिता व्ही. राणे यांनी सोसायटीला सदर सूचनेच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत ड्युप्लिकेट शेअर प्रमाणपत्र जारी करण्यासाठी अर्ज केला आहे. जर या काळात कोणतेही दावे/ आक्षेप न मिळाल्यास सोसायटी ही ड्युपलिकेट प्रमाणपत्र जारी करण्यासाठी मुक्त असेल.

२९.११.२०१८

सचिव
नित्य सुखधाम सीएचएस लि.

वकीलांद्वारे जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, (१) श्री. जयंत शाह वय ५८ वर्ष आणि [२] श्रीम. निरू जयंत शाह दोघेही फ्लॅट क्र. ८०३, ई विंग, आकृती ऑर्किड पार्क ई ॲन्ड जी विंग सी.एच.एस लि., अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०७२ येथे राहणार परिशिष्टातील नमूद मिळकत माझ्या अशीलांकडे विक्रीकरिता सहमती दिली आहे.

सर्व व्यक्तींना सदर मिळकत किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये कोणताही दावा, हितसंबंध असल्यास विक्री, बक्षीस, भाडेपट्टा, वारसा, अदलाबदल, गहाण, प्रभार, धारणाधिकार, विश्वस्त, ताबा, सुविधाधिकार, जप्ती किंवा याशिवाय कोणत्याही प्रकारच्या मार्गे सारखे ओळखले जाणाऱ्या लिखित स्वरूपात निम्नस्वाक्षरीकारांना तिचे कार्यालय ३–सी, कल्पतरू इस्टेट, जे.व्ही.एल.आर., अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०९७ येथे दिनांकापासून १५ दिवसांच्या आत कळवावे, कसूर केल्यास अशा दाव्यांच्या संदर्भाशिवाय सदर विक्री पूर्ण केली जाईल, आणि कोणतेही दावा असल्यास सोडून दिल्याचे गृहीत धरले जाईल.

मिळकतीचे वर्णन आणि परिशीष्ट

वर नमूद सदर फ्लॅट आणि सदर शेअर्सच्या संबंधित पढीत निधी, सर्व रकमेमधील लाभासह मुंबई उपनगर आणि मुंबई शहराचा नोंदणीकृत जिल्हा आणि उप जिल्हा मधील गाव मोहीली, तालुका कुर्लाचे धारक सीटीएस क्र.६९३ आणि ६९९ जमीनीचे प्लॉटवर अंधेरी कुर्ला रोड, साकीनाका, मुंबई ४०० ०७२ येथे स्थित आकृर्ती ऑर्किड पार्क ई ॲन्ड जी विंग सीएचएस लि., अशा ज्ञात इमारतीच्या ८व्या मजल्यावर मोजमापित ६४८ चौ.फू [चटई क्षेत्र] म्हणजे ६०.२२ चौ.मी 'ई' विंग [मधील फ्लॅट क्र. ८०३ आणि श्री. जंयत शाह आणि श्रीम. निरू शाह यांच्या नावे असलेली ई ॲन्ड जी विंग सी.एच.एस. द्वारे जारी केलेले रू. २५०/– चे [रूपये दोनशे पन्नास मात्र] एकूण मूल्य चे प्रत्येकी रू. ५० [रूपये पन्नास] दर्शनी मूल्याचे ते सर्व पाच [५] शेअर्स.

दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८.

वकील धनश्री चौधरी
वकील उच्च न्यायालय

ॲक्रिसिल लिमिटेड

सीआयएन : एल २६९१४ एमएच १९८७ पीएलसी ०४२२८३
नों. कार्यालय : बी–३०७, सिटी पॉईंट, जे. बी. नगर, अंधेरी–कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई–४०० ०५९
दू. क्र. : ०२२–४०१५ ७८१७/१८/१९, फॅक्स: ०२२–२८२५ ८०५२
वेबसाईट : www.acrysilcorporateinfo.com, **ई–मेल आयडी :** cs.al@acrysil.com

सूचना

इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) ऑथॉरिटीकडे कंपनीच्या समभागांचे हस्तांतरण

कंपनी अधिनियम, २०१३ ('अधिनियम') च्या कलम १२४ (६) सहवाचता सुधारित केलेल्या इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड ऑथॉरिटी (अकाऊंटिंग, ऑडिट, ट्रान्स्फर ॲण्ड रिफंड) रुल्स, २०१६ ('नियम') च्या तरतुदींनुसार सलग सात किंवा जास्त वर्षाच्या कालावधींसाठी ज्यांच्या संबंधात लाभांशावर भागधारकांनी दावा केलेला नाही किंवा प्रदान केले नाही ते कंपनीचे सर्व समभाग आयईपीएफ ऑथॉरिटीच्या डिमॅट खात्यामध्ये हस्तांतरित करणे आवश्यक आहे.

त्यांच्या दावा न केलेल्या लाभांशावर दावा करण्याचा सल्ला देण्यासाठी कंपनीने आयईपीएफ ऑथॉरिटीच्या डिमॅट खात्यामध्ये हस्तांतरित होण्यास ज्यांचे शेअर्स पात्र ठरले आहेत अशा संबंधित भागधारकांच्या नोंदणीकृत पत्त्यावर वैयक्तिकरित्या कळविले आहे. आयईपीएफ ऑथॉरिटीकडे ज्यांचे शेअर्स हस्तांतरित होऊ घातले आहेत अशा भागधारकांचे तपशील कंपनीने तिची वेबसाईट : www.pidilite.com वर अपलोड देखील केले आहेत.

भागधारकांनी कृपया दावा न केलेले लाभांश आणि आयईपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित होण्यास पात्र ठरलेल्या शेअर्सचे तपशील पडताळण्याकरिता सदर वेबसाईटला भेट द्यावी.

प्रत्यक्ष पध्दतीने ज्यांनी शेअर्स धारण केले आहेत आणि ज्यांचे शेअर्स आयईपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित होण्यास पात्र ठरले आहेत अशा संबंधित भागधारकांनी ध्यानात ठेवावे की, आयईपीएफ ऑथॉरिटीकडे शेअर्सचे हस्तांतरण झाल्यावर; त्यांच्या नावे नोंदणीकृत असलेले मूळ शेअर प्रमाणपत्र(त्रे) आपोआप रद्द ठरतील व अ–पराक्रम्य असल्याचे समजले जाईल.

डिमॅट पध्दतीने धारण केलेल्या शेअर्सच्या बाबतीत, हस्तांतरित होण्यास पात्र ठरलेल्या शेअर्स इतके, भागधारकाच्या खात्यामधून कापून घेतले जातील. जर संबंधित भागधारकांनी २८ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत त्यांच्या दावा न केलेल्या लाभांशावर दावा केला नाही तर नियमांचे पालन करण्याच्या दृष्टीने कंपनी भागधारकांना पुढे कोणतीही सूचना न देता आयईपीएफ ऑथॉरिटीकडे शेअर्स हस्तांतरित करेल आणि अशा हस्तांतरित झालेल्या शेअर्सच्या संबंधात कंपनी विरुध्द कोणतेही दायित्व असणार नाही.

भागधारकांनी ध्यानांत ठेवावे की, आयईपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित झाल्यावर अशा शेअर्सवर उपार्जित झालेल्या सर्व लाभांसह ते नियमांमध्ये विहित केलेल्या प्रक्रियेनुसार फॉर्म आयईपीएफ–५ मध्ये आयईपीएफ ऑथॉरिटीकडे एक अर्ज करून परत मागू शकतो आणि तो आयईपीएफ वेबसाईट म्हणजेच www.iepf.gov.in वर उपलब्ध केला आहे.

उक्त विषयाबाबत भागधारकांना कोणतीही विचारणा करायची असल्यास, ते कंपनीचे रजिस्ट्रार ॲण्ड ट्रान्स्फर एजंट, बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी १ ला मजला, भारत टीन वर्क्स बिल्डिंग, वसंत ओअँसिससमोर, मकवाना रोड, मरोळ, अंधेरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र–४०० ०५९. दू. : ०२२–६२६३८२२१/२२/२३/००, ई–मेल : investor@bigshareonline.com येथे संपर्क साधू शकतात.

संचालक मंडळाच्या आदेशाने
ॲक्रिसील लिमिटेडसाठी
सही/–
दामोदर एच. सेजपाल
कंपनी सेक्रेटरी

मुंबई
दिनांक : २९ नोव्हेंबर, २०१८

गोरेगाव,मुंबई येथील नगर दिवाणी न्यायालय,
बोरिवली विभाग, दिंडोशी मधील
एस.सी. वाद क्र. १९ सन २००९
मधील निष्पादन अर्ज क्र. २० सन २०१८

चंद्रराज को– ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड ... वादी
विरुध्द
जगनारायणसिंग रामफेरसिंग आणि अन्य ... प्रतिवादी

(सी.पी.सी.च्या O. XXI R. ११(२) अंतर्गत अंमलबजावणीसाठी अर्ज:

ए	वाद क्रमांक	अल्प कारण वाद क्र. १९ सन २००९
बी	पक्षकारांचे नाव	चंद्रराज को– ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड ... वादी विरुध्द जगनारायणसिंग रामफेरसिंग आणि अन्य ... प्रतिवादी
सी	आदेश/हुकुमाची तारीख	१९ सप्टेंबर, २०१६
डी	हुकूम/आदेशावरून कोणते अपील दाखल केले का	हो एचसी (एएस) मध्ये २३/१२/२०१६ रोजी सादर करण्यात आलेले एफएएसटी नं. ३५८९९/२०१६ असलेले पहिले अपील, स्थगितीसाठी सीएएफएसटी नं. ३५९०० सन २०१६ आणि सीएएफएसटी नं. ३५९०१/२०१६, दिनांक १९.०९.२०१६ च्या अंमलबजावणी हुकूमास अजूनपर्यंत स्थगिती मिळाली नाही, हुकूम मंजूर झाला आहे.
ई	हुकूमाच्या नंतर पक्षकारांमध्ये विवादाचे कोणते समायोजन झाले का	नाही
एफ	१) निवाडा/कर्जदारांविरुध्द कोणत्याही रीटची तारीख आणि स्वरूप २) हुकुम/किंवा आदेशाच्या अंमलबजावणीसाठी पूर्वी कोणताही अर्ज केला होता का.	निरंक निरंक
जी	प्रतिवादींविरुध्द अर्ज किंवा भरपाईची रक्कम	वाद क्र. १९/२००९ मध्ये वादातील विनंती खंड (ए), (बी) आणि (सी) च्या बाबतीत हुकुम
एच	मंजुर करण्यात आलेली खर्च रक्कम (असल्यास)	गैर लागू
आय	ज्या व्यक्तीविरुध्द हुकूम/किंवा आदेश अंमलात आणायचा आहे तिचे नाव	प्रति, जगनारायणसिंग रामफेरसिंग, उपरिनामित प्रतिवादी क्र. १. (प्रतिवादी क्र. २ ते ४ यांच्यावर बजावणी झाली आहे)
जे	न्यायालयाचे सहाय्य कोणत्या माध्यमातून आवश्यक आहे	१) कृपाकरून उपरिनामित प्रतिवादींविरुध्द सी.पी.सी.च्या आदेश XXI नियम ३४ अन्वये सूचना जारी करून त्याद्वारे त्यांना सदर सूचनेला जोडलेल्या अभिहस्तांतरणाच्या मसुद्याला कोणताही आक्षेप असल्यास तो सांगण्यासाठी ह्या नामदार न्यायालयासमोर बोलवावे. २) सदर सूचना कायम केल्यावर आणि जर प्रतिवादींनी हुकुमाचे पालन केले नाही तर, ह्या नामदार न्यायालयाचे प्रबंधक किंवा ह्या नामदार न्यायालयास योग्य व सक्षम वाटेल अशा अन्य व्यक्तीला वादींच्या नावात येथे खाली वर्णन केलेल्या सदर प्लॉट आणि सदर इमारत बांधकाम हस्तांतरित व अभिहस्तांतरित करण्यासाठी आवश्यक अभिहस्तांतरण निष्पादित करण्याचे आणि ते नोंदणीसाठी दाखल करण्याचे व त्याचे निष्पादन नोंदवून घेण्याचे आणि त्याचप्रमाणे महसुली नोंदीमध्ये मालक म्हणून वादींचे नाव नोंदवले जाण्याकरिता आवश्यक अर्ज, प्रपत्रे आणि दस्तावेजांवर स्वाक्षऱ्या करण्याचे निर्देश द्यावेत. वादग्रस्त मिळकतीचे वर्णन:– सर्व्हे क्र. ४ (ए) भाग आणि ५ (ए) भाग, सीटीएस क्र. १५ भाग धारक सुमारे १५०२.४९ चौ. मीटर्स मोजमापित मुंबई शहर आणि मुंबई उपनगरच्या नोंदणी उप–जिल्हा व जिल्ह्यातील गाव चिंचोली (मालाड), तालुका बोरिवली, मुंबई उपनगर जिल्हा येथे स्थित असलेली पोट विभागणी केलेल्या प्लॉट क्र. बी ची ती सर्व अखंड जमीन किंवा भूमी जी पुढीलप्रमाणे सीमाबध्द: उत्तरेस – चंद्रराज बिल्डिंग नं. २, दक्षिणेस – प्रस्तावित उद्यान, पूर्वेस – अंतर्गत रस्ता, पश्चिमेस – खोत यांची मिळकत – मालाड गाव. वादींच्या नावे करून नोंदणीसाठी सादर करावे व त्याचे निष्पादन नोंदवून घ्यावे. (बी) पुढे असे आदेश देण्यात येतात की, महाराष्ट्र ओनरशिप ऑफ फ्लॅट (रेग्युलेशन ऑफ दी प्रमोशन ऑफ कन्स्ट्रक्शन सेल मॅनेजमेंट अँड ट्रान्स्फर) ॲक्ट, १९६३ अन्वये प्रतिवादींना संयुक्तपणे आणि/किंवा वेगवेगळे त्यांची खालील बांधिलकी निभावण्यास सांगितली, म्हणजेच, वादींच्या नावात त्यावर बांधलेल्या ''चंद्रराज अपार्टमेंट'' नावाच्या इमारत आणि बांधकामांसह एकत्रितपणे वादग्रस्त मिळकतीमधील अधिकार, हक्क आणि हितसंबंध हस्तांतरित व अभिहस्तांतरित करणे, आदेश दिले की, जर वरील विनंती (ए) आणि (बी) च्या बाबतीत हुकुमाचे पालन करण्यात प्रतिवादींनी कसूर केल्यास ह्या नामदार न्यायालयाचे प्रबंधक किंवा ह्या नामदार न्यायालयास योग्य आणि सक्षम वाटेल अशा अन्य व्यक्तीला उपरोल्लेखित कृती आणि विलेख करण्याचे आणि आवश्यक अभिहस्तांतरण, हस्तांतरण करून सदर प्लॉट आणि सदर इमारत बांधकाम वादींच्या नावे अभिहस्तांतरित करून ते नोंदणीसाठी सादर करण्याचे आणि त्यांचे निष्पादन नोंदवून घेण्याचे आणि त्याचप्रमाणे महसुली नोंदीमध्ये मालक म्हणून वादींचे नाव नोंदवले जाण्याकरिता आवश्यक अशा अर्ज, प्रपत्रे आणि दस्तावेजांवर स्वाक्षरी करण्याचे निर्देश द्यावेत.

(न्या. खो.क्र. १ मधील पीठासीन सन्माननीय न्यायाधीश श्री. एस. सी. मोरे यांच्यासमोर वरील निष्पादन अर्ज पटावर मांडला जाईल).

मे. विनोद मिस्त्री अँड कं.साठी
सही/–
वादींसाठी वकील
विनोद मिस्त्री अँड कं.
वादींसाठी वकील
राजाबहादूर मॅन्शन, २ रा मजला,
२०, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई–४०० ०२३.
दू.क्र.: ०२२–२२६७६७३६/६६५४
फॅक्स क्र.: २२६७६८२४
कोड आय–७०९६

सही/–
वादी

जाहीर नोटीस

तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण यांचे न्यायालयात अर्जदार **श्रीम. सुनिता प्रकाश लहांगे व इतर १३, रा. राजावली, ता. वसई, जि. पालघर** यांनी गाव **मौजे राजावली, ता. वसई येथील स.नं. (जुना १३५)/नवीन १४९/२ क्षेत्र १.३८.५ पो.ख. ०–३५–५ हे.आर. ह्यापैकी १.२८.५ गुंठे, आकार १४–३१** या जमिनीचे **मालक श्री. अंतोन गिरगोल दालमेद व इतर १६ रा. माणिकपूर, ता. वसई, जि. पालघर** यांचे नावे दाव्यातील ७/१२ उताऱ्यात कब्जेदार सदरात आहेत. सदर जमिनीची अर्जदार यांनी कुळ कायदा अन्वये **दावा क्रमांक ३२ग/३८/२०१६ दिनांक ०६/०६/२०१६** रोजी दाखल केलेला आहे. सदरची जमीन **श्रीम. सुनिता प्रकाश लहांगे व इतर १३, रा. राजावली, ता. वसई, जि. पालघर** यांचे कब्जेवहिवाटीत आहे. जमिनीचे **श्री. अंतोन गिरगोल दालमेद, रा. माणिकपूर, ता. वसई, जि. पालघर** हे हद्दीत राहत नसून त्यांना नोटीस बजावण्यात आली नाही. सदर नोटिसीबाबत कोणाचीही कोणतीही हरकत असल्यास त्यांनी **दिनांक १४/१२/२०१८** रोजी सुनावणीच्या अंतिम तारखेस हजर राहून लेखी हरकत नोंदवावी. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सही/–
तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, वसई

TATA

TATA STEEL LIMITED

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ आणि कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम १०(१) ला अनुसरून याद्वारे सूचना देण्यात येते की, प्रायव्हेट प्लेसमेंट बेसिसवर जारी केलेल्या आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंटवर सूचिबद्ध केलेल्या नॉन–कन्व्हर्टीबल डिबेंचर्स वरील व्याज खालील प्रकारे देय आहे.

अनु. क्र.	नॉन–कन्व्हर्टीबल डिबेंचर्स (एनसीडीज)	व्याजाची नियत तारीख	व्याज प्रदानासाठी रेकॉर्ड डेट
१	एकूण रु. ५०० कोटींची २२ डिसेंबर, २०१० रोजी वाटप केलेली १०.२५% एनसीडीज (ISIN:INE081A08140)	२४ डिसेंबर, २०१८ (२२ डिसेंबर, २०१८ व २३ डिसेंबर, २०१८ ह्या दिवशी बँकांना सुट्टी असल्याने)	१८ डिसेंबर, २०१८

टाटा स्टील लिमिटेड
सही/–
पार्वथीसम के.
कंपनी सेक्रेटरी

२९ नोव्हेंबर, २०१८
मुंबई

TATA STEEL

जाहीर सूचना

ICICI Bank

आयसीआयसीआय बँक लि.
नोंदणीकृत कार्यालय : आयसीआयसीआय बँक लिमिटेड, लँडमार्क, रेस कोर्स सर्कल, वडोदरा ३९०००७.
निगम कार्यालय : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई–४०००५१.
शाखा कार्यालय: आयसीआयसीआय बँक लि., कार्यालय क्र. २०१–बी, रोड क्र. १, प्लॉट क्र. बी३, वायफाय आयटी पार्क घाघळे इंडस्ट्रिअल इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र– ४००६०४

सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये सूचना.

आयसीआयसीआय बँक लिमिटेड (''तारण धनको, ज्यात त्यांचे उत्तराधिकारी आणि अभिहस्तांकिती समाविष्ट) आणि खालील नमूद कर्जदार आणि सह–कर्जदार यांच्यातील कर्ज करारानुसार संमत करण्यात आलेल्या गृह कर्ज सुविधासंबंधी सदर सूचना सुरक्षेच्या अंमलबजावणीकरिता निर्गमित करण्यात येत आहे.

तारण धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे ('प्राधिकृत अधिकारी') सूचना देण्यात येते की, खालील कर्जदार हे तारण ऋणकोंकडून प्राप्त करण्यात आलेल्या गृह कर्ज सुविधेतील मुद्दल रक्कम आणि व्याजाचा भरणा करण्यास कसूरवार ठरले आहेत आणि कर्जाचे नॉन परफॉर्मिंग ॲसेटस्मध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. सदर सूचना त्यांना सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत त्यांच्या ज्ञात पत्त्यावर निर्गमित करण्यात आली होती, तथापि ती न बजावता परत आली आणि म्हणून त्याबाबत जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्जदार/सह–कर्जदार/ हमीदाराचे नाव (कर्ज खाते क्रमांक) आणि पत्ता	अंमलबजावणीयोग्य मत्ता/ तारण मत्तेच्या मिळकतीचा पत्ता	सूचना पाठविल्याची तारीख/ सूचनेच्या रोजीस थकबाकी (रुपयांत)	एनपीए तारीख
१.	आर–राजासे कार/ मिना शंकारी आर– क्र.५ लक्ष्मी कॉलनी १ स्ट्रीट मॅकरोड एसावरी नगर तंजोरे– ६१३००४/ एलबीटीआरआय००००० ३५४०३५	तिरूचुरापल्ली जिल्हा, जिरूची तालुका, तिरूची, नोंदणीकृत जिल्हा, श्रीर